दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१२ ऑक्टोबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 12 Oct 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 55 ● Pages 4 ● Rate 4 Rs

राजकीय हस्तक्षेप सहन केला जाणार नाही

मुंबई–अजित पवारांनी ठाम भूमिका घेत सांगितले की, राजकीय नेत्यांच्या दबावाखाली पोलिसांनी निर्णय घेऊ नयेत. कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई करायची, एवढेच काम आहे. शिफारस कोणाची आहे हे गौण आहे. ते पुढे म्हणाले की, गेल्या ३२ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत मी नेहमी सांगतो, एखाद्या फाईलवर माझी शिफारस असली, तरी जर ती वस्तुस्थितीला धरून नसेल, तर सचिव किंवा पोलिसांनी लक्षात आणून द्यावे. जर तरीही चुकीच्या शिफारशीवर निर्णय झाला, तर तो मंत्री दोषी ठरेल. अजित पवारांच्या या वक्तव्यामुळे आता योगेश कदम यांच्या भूमिकेवर नवे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उद्धव ठाकरेंनी हंबरडा मोर्चापूर्वी आरसा पाहावा-देवेंद्र फडणवीस यांचा टोला

पक्षाला जिवंत ठेवण्यासाठी हंबरडे फोडत असल्याचा आरोप

दैनिक वादळ वार्ता
मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी हंबरडा मोर्चा काढण्यापूर्वी स्वतःला आरशात पाहा, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना हाणला. उद्धव ठाकरे यांनी स्वतःला आरशात पहावे. त्यांनी स्वतःला आरशात पाहिले तर ते अशा प्रकारचे मोर्चे काढणार नाहीत, असे ते म्हणालेत.महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांना विशेषतः मराठवाड्याला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासह इतर मागण्यांसाठी ठाकरे गटाने छत्रपती संभाजीनगरात हंबरडा मोर्चा काढला आहे. उद्धव ठाकरे यांनी स्वतः या मोर्चाचे नेतृत्व केले. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना वरील टोला हाणला आहे. फडणवीस म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी एकदा स्वतःला आरशात बघितले, तर ते अशा प्रकारचे मोर्चे काढणार नाहीत. मी यापूर्वीही सांगितले की, ठाकरेंनी त्यांच्या सरकारच्या काळात २० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पण त्यांनी फुटकी कवडी शेतकऱ्यांना दिली नाही.

ते पुढे म्हणाले, उद्धव ठाकरे यांच्या पूर्वी आम्ही सत्तेत होतो. तेव्हाही आम्ही शेतकऱ्यांना २० हजार कोटींची कर्जमाफी केली होती. त्यामुळे त्यांनी काही फार मोठे काम केले असे नाही. उलट त्यांनी घोषणा केली होती, चालू खात्यावर आम्ही ५० हजार रुपये देऊ. पण प्रत्यक्षात त्यांनी काहीही दिले नाही. उलट १६ लाख

शेतकऱ्यांना महायुतीचे सरकार आल्यावर अनुदान देण्यात आले.सरकारने शेतकऱ्यांना सुमारे ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिलेले आहे. ठाकरेंनी त्यांच्या काळात केलेल्या कर्जमाफीपेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांना दिले जात आहेत. त्या व्यतिरिक्त ६ हजार रुपये राज्याचे आणि ६ रुपये केंद्राचे देण्यात येत आहेत. विम्याची रक्कम वेगळी असणार आहे. कुठे तरी पक्षाला जिवंत ठेवायचे आहे, म्हणून ते हंबरडे फोडत आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना त्यांच्या जिल्ह्यात कुणी ओळखत नाही, त्यांच्या आरोपांवर मी काय उत्तर द्यायचे, असेही फडणवीस यावेळी एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या प्रकरणी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला. खासदार पडले तेव्हा हंबरडा फोडला. विधानसभा निवडणुकीत आमदार पडले तेव्हा हंबरडा फोडला. ते आणखी कितीवेळा हंबरडा फोडणार आहेत? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला.आमच्या पॅकेजवर टीका करणारे उद्धव ठाकरे हे पैठण येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेटायला गेले होते. तेव्हा ते १ लाख रुपयांचा धनादेश देणार असे शेतकऱ्यांना सांगण्यात आले होते. पण त्या शेतकऱ्याला एक फुटकी कवडीही त्यांनी दिली नाही. तुम्ही मुख्यमंत्री होता, तेव्हाही तुम्ही शेतकऱ्यांना मदत केली नाही. म्हणूनच शेतकऱ्यांनी तुम्हाला घरी बसवले, असे शिंदे म्हणाले.

विषारी सर्पदंशाने सर्पमित्राचा मृत्यू

दैनिक वादळ वार्ता
वडाळी । लाला चव्हाण

शहादा तालुक्यातील वडाळी येथील सर्पमित्र मनिष मुकुंदा बैसाणे यांचे शनीवारी सायंकाळच्या सुमारास विषारी साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. वडाळी गावाजवळील उभादगड येथील एकाच्या घरात सर्प निघाल्याची माहिती मिळाल्याने मनीष त्याठिकाणी गेला असता तेथे सर्प पकडन्याचा प्रयत्न करीत असतांना विषारी सर्पांचा दंश झाल्याने त्याला तात्काळ मोहिदा ता. शहादा येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले येथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. मागील काही वर्षांपासून अनेक सापांना वाचवून नैसर्गिक अधिवासात सोडुन नवीन जीवनदान देण्याचे कार्य करीत होता त्यामुळे मनीष सर्वपरिचित झाला होता. त्याचा मृत्यूची वार्ता मिळताच नातेवाईक व कुटुंबियांनी एकच आक्रोश केला. मनिष हा परिसरात मनमिळावू व होतकरू असल्याने त्याच्या दुर्दैवी मृत्यूने परिसरात हळ हळ व्यक्त करण्यात येत आहे. आज दुपारी त्याचा शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आला. त्याचा पश्चात आई वडील दोन भाऊ असा परिवार आहे.

बीड नगर परिषदेच्या नगरअध्यक्षपदा साठी पुरुषोत्तम वीर यांच्या पत्नी

आम्रपाली वीर यांना 'वंचित बहुजन आघाडी कडून उमेदवारी देण्याची मागणी

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या आगामी नगर अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पुरुषोत्तम वीर यांना वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी बीडमधील जनतेकडून जोर धरू लागली आहे गेल्या तीस ते ३५ वर्षापासून जो बीडचा विकास व्हायला पाहिजे तसा विकास झालेला नाही अनेक ठिकाणी घाणिचे साम्राज्य स्वतंत्र ड्रेन्नेज नाही . पिण्याच्या फुटलेल्या पाईपलाईन मधे नाल्याचे पाणी . रस्त्यावर बाजारपेठा. मोठ मोठे दालन उभावरून त्यात मुताऱ्या होऊ लागल्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे १५ / १६ दिवसाला नळाला पाणी. शहरात सिटी बस नाही त्यामुळे शहराचे व्यवस्थापन थांबले अनेक भागात रस्ते नाहीत. शहरात असलेल्या बिंदूसरा नदीच्या मूख्यपूलाला आनेक वर्षापासून कठडे नाहीत .

असे अनेक समस्या शहरातील आहेत त्यामुळे बीड शहराच्या विकासाची ज्यांना जान आहे आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तळमळ आसलेल्या

पुरुषोत्तम वीर यांना नगर अध्यक्षपदाची निवडणूक लढवावी, अशी मागणी बीड शहरातील नागरिक व्यक्त करत आहेत. शहराच्या समस्यांची जाण आहे आणि ते वंचित तसेच मागासलेल्या घटकांना न्याय मिळवून देऊ शकतात. त्यांच्या उमेदवारीमुळे 'वंचित'ची ताकद वाढेल आणि नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण होतील, असा विश्वास जनतेला वाटत आहे. या मागणीमुळे आता वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर साहेब यांनी पुरुषोत्तम वीर यांना संधी द्यावी अशी मागणी शेख रेहान,शेख फरहान, शेख तय्यब, शेख सलमान,शेख अरहम,शेख शेरु, शेख जहीर,सय्यद ऊबेद, शेख रिजवान यांच्यासह आदींनी केली आहे.

येणारी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक शिवसेनेसाठी अत्यंत महत्त्वाची

आ.चंद्रकांत रघुवंशी यांचे कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार दिपक गोसावी

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाची महत्त्वाची बैठक संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच नंदुरबार येथे पार पडली. ही येणारी निवडणूक पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची असून, कार्यकर्त्यांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकदिलाने उमेदवारांच्या यशासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन आमदार रघुवंशींनी यावेळी केले.

शुक्रवारी आमदार कार्यालयात नंदुरबार तालुक्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची ही बैठक घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना श्री. रघुवंशी म्हणाले की, जिल्हा परिषद आणि पंचायत

समितीच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेणे गरजेचे आहे. उमेदवाराचा विजय कसा होईल, याकडे सर्वांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे. तसेच, यंदाची निवडणूक पक्षासाठी निर्णायक असून, जिल्हा परिषदेवर भगवा फडकवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाप्रमुख डव्होकेट राम रघुवंशी यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले की, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आरक्षण जाहीर होताच कार्यकर्त्यांनी तात्काळ पक्षाच्या कामाला सुरुवात करावी. शिवसेनेकडून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह आमदार कार्यालयात संपर्क साधावा. यासोबतच, शिवसेनेच्या ऑनलाईन सदस्य नोंदणीनंतर आता सक्रिय सभासद नोंदणी करणे आवश्यक असून, ती पूर्ण करण्याचे आवाहन डव्होकेट रघुवंशी यांनी शेवटी केले.

या महत्त्वपूर्ण बैठकीला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष वकील पाटील, रमेश गावित, शेतकरी संघाचे अध्यक्ष बी के पाटील,माजी नगराध्यक्ष रवींद्र परदेशी, जिल्हा परिषद सदस्य देवमन पवार, माजी सभापती विक्रमसिंह वळवी, शिवसेना तालुकाप्रमुख डॉक्टर सयाजीराव मोरे, माजी पंचायत समिती उपसभापती प्रल्हाद राठोड, शेतकी संघाचे संचालक सुरेश शिंत्रे, ज्येष्ठ शिवसैनिक ताराचंद माळसे, जिल्हा परिषद सदस्य अंबू पाडवी, बाजार समिती सभापती दीपक मराठे, मजुरी फेडरेशन सभापती अंकुश पाटील, रोहिदास राठोड, भरत पाटील, किशोर पाटील, नवीन बिर्ला, कमलेश महाले, संतोष साबळे आदी मान्यवर उपस्थित होते. नंदुरबार तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या बैठकीला हजर होते.

तोतया 'मुन्नाभाई एमबीबीएस 'डॉक्टरांचा पर्दाफाश!

वैद्यकीय पदवी नसताना क्लिनिक चालवणाऱ्या पश्चिम बंगालमधील दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
मोलगी । रविंद्र वळवी

कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना आणि 'महाराष्ट्र कौन्सील ऑफ इंडियन मेडिसीन'ची मान्यता नसताना अवैधरित्या वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या दोन तोतया डॉक्टरांचा नंदुरबार जिल्ह्यातील मोलगी परिसरात पर्दाफाश झाला आहे. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार मोलगी पोलीस स्टेशनमध्ये दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि 'महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१' अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील बडी उखलापाडा (बडींचा चनाईपाडा) आणि हुणाखांब चनवाईपाडा या दुर्गम भागात दोन व्यक्ती वैद्यकीय व्यवसाय करत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तुप्ती नामदेव पटले यांना मिळाली होती. त्यांनी केलेल्या तपासणीत धक्कादायक बाब समोर आली. दिपनकर सुर्यकांत विश्वास (वय ५०) आणि कृष्णपद जगन्नाथ मंडल (वय ४२), हे दोघेही मूळचे पश्चिम बंगालमधील नडिया जिल्ह्यातील रहिवासी असून त्यांनी या भागात क्लिनिक थाटले होते.

फिर्यादी डॉ. तुप्ती पटले यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींकडे वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी कोणतीही अधिकृत पदवी किंवा महाराष्ट्रात व्यवसाय करण्याची एमसीआयएमची मान्यता नाही. अशाप्रकारे पदवी नसताना लोकांच्या आरोग्याशी खेळ खेळल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध दि. ०९/१०/२०२५ रोजी दुपारी ४:५५ ते सायंकाळी ६:३० या वेळेत अवैद्यकीय व्यवसाय केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मोलगी पोलीस स्टेशनमध्ये दि. १०/१०/२०२५ रोजी पहाटे ०२:०५ वाजता गु. र. क्रं. १२७/२०२५ अन्वये भा.न्या. सं. च्या कलम ३१९ (२), ३१८ (४), १२५ ३(५) तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३३, ३३ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अटक पाहिजे आरोपींमध्ये दिपनकर विश्वास आणि कृष्णपद मंडल यांचा समावेश असून, ते दोघेही पश्चिम बंगालमधून येऊन नंदुरबारच्या आदिवासीबहुल भागात हा बोगस व्यवसाय करत होते. कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना डॉक्टर म्हणून व्यवसाय करणे हेच या गुन्ह्याचे प्रमुख कारण आहे.या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक दीपक पावरा हे करत असून, त्यांनी बोगस डॉक्टरांविरुद्ध कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. पोलीस निरीक्षक निलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. आरोग्य विभागाने केलेल्या

उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा मोर्चा

दैनिक वादळ वार्ता
छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आज उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढण्यात आला. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई आणि सरसकट कर्जमाफी मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी हा मोर्चा क्रांती चौकातून सुरू झाला. पीक विम्याचे निकष बदलण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.या मोर्चात शिवसेना नेते आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार संजय जाधव, खासदार नागेश आष्टीकर, विनोद घोसाळकर, आमदार राहुल पाटील, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, चंद्रकांत खैरे, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, लक्ष्मण वडले, ज्योती ठाकरे, उदयसिंह राजपूत, राजू वैद्य, राजेंद्र राठोड आणि बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित होते.मोर्चादरम्यान 'सातबारा कोरा करा', 'हेक्टरी ५० हजार द्या' अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. तसेच, 'या सरकारचे करायचे काय, खाली मुंडके वर पाय' आणि 'फसवे सरकार' अशा घोषणा देत देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा निषेध करण्यात आला.

संपादकीय

विदर्भाचे औद्योगिक मागासलेपण 'जैसे थे'च

विदर्भाच्या औद्योगिक विकासासाठी उच्च न्यायालयानेच अभ्यास गट स्थापन करून देखरेख करावी. विदर्भाच्या मागासलेपणाचा मुद्दा जेव्हा चर्चेला येतो, तेव्हा त्यात औद्योगिक मागासलेपण हा मुद्दा प्रामुख्याने मांडला जातो. मात्र शासन स्तरावर त्याची 'जैसे थे'च परिस्थिती राहते. त्यामुळे आता मुंबई उच्चन्यायालयालाच त्याची दखल घ्यावी लागली आहे.महाराष्ट्राचे गठन झाल्यावर राज्याचा समतोल विकास व्हावा या दृष्टीने राज्य सरकारने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) स्थापना केली. या महामंडळाच्या सौजन्याने राज्यात अगदी तालुकास्तरावर औद्योगिक वसाहती उभ्या केल्या गेल्या. त्यासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीदेखील अधिग्रहित केल्या गेल्या. त्यावेळी त्यांच्यासमोर रोजगाराचे गाजर ठेवण्यात आले होते. मात्र आज या औद्योगिक वसाहतींची आणि तिथल्या उद्योगांची अवस्था दयनीय म्हणावी लागेल अशी आहे. मिळालेल्या माहितीनुसार विदर्भाच्या ११ जिल्ह्यांत एकूण ९८ औद्योगिक वसाहती उभ्या केल्या आहे. त्यात १६,१६६ औद्योगिक भूखंड तयार करण्यात आले. त्यातील १४,०३१ भूखंड उद्योगांना आवंटित करण्यात आले. त्यातील जेमतेम ६,७४५ उद्योग सुरू आहे. ३,१०६ युनिट सुरू होऊन बंद पडले, तर १,२४६ युनिट्स सुरू झाले नाहीत. याशिवाय एमआयडीसीनेच विदर्भात १० सहकारी तत्त्वावरील औद्योगिक वसाहती देखील उभ्या केल्या. त्यातील २,३२७ पैकी २,२४८ भूखंडाचे वाटप झाले आहे. त्यातील १,५९३ युनिट्स कार्यरत आहेत, तर १२० युनिट्स बंद पडले आहेत, अशी माहिती एका वृत्तपत्रात एका लेखमालिकेद्वारा प्रकाशित करण्यात आली. ही वाचून मुंबई उच्चन्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल किल्लोर आणि रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने स्वतःहून या संदर्भात जनहित याचिका दाखल करून घेतली असून ॲड. संकेत करपे यांना न्यायालयीन मित्र म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.एमआयडीसीने तयार केलेल्या या सगळ्याच औद्योगिक वसाहती लघू आणि मध्यम उद्योगांसाठी होत्या. याशिवाय विदर्भात त्या-त्या वेळी त्या-त्या भागातील नेत्यांच्या आग्रहामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या सहयोगाने काही मोठे उद्योग देखील सुरू झाले. त्यातीलही अनेक उद्योग बंद पडले आहे तर काही आचके देताना दिसत आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास चंद्रपूर येथील महाराष्ट्र इलेक्ट्रोस्मेंल्ट हा उद्योग अक्षरशः बंद पडण्याच्या अवस्थेत आला होता. त्यावेळी तत्कालीन केंद्रीय मंत्री वसंत साठे यांच्या प्रयत्नामुळे स्टील अथॉरिटी ऑफ इंडियाने तो प्रकल्प चालवायला घेतला म्हणून तो बरा चालला आहे. एरवी भंडाऱ्याचा अशोक लेलँड, गपूरचा मेल्ट्रॉन, महाराष्ट्र ॲंटिबायोटिक्स, असे वर्धेचा नोबल एक्सप्लोकेम, महाराष्ट्र एक्सप्लोसिव्हज् असे बरेच प्रकल्प बंद पडले तरी आहे किंवा बंद पडण्याच्या मार्गावर तरी आहेत. नागपूर जिल्ह्यातला संत्रा उद्योग प्रक्रिया प्रकल्प देखील गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेलाच आहे. तीच गत अमरावतीच्या टेक्स्टाईल पार्कची देखील आहे. इथे राज्य आणि केंद्र सरकारचा पैसा गुंतलेला असतो. कारखान्याचा ढाचा उभा राहून यंत्रसामग्रीदेखील लागलेली असते आणि ती वर्षानुवर्षे धुळखात राहते. वेदर्भियांना त्याचा काहीही उपयोग होत नाही.इथे राज्य सरकारच्या आग्रहाखातर मोठे उद्योगपती येतात. ते स्वस्तात जमीन घेतात. सर्व सवलती घेतात आणि उद्योग उभाही करतात. मात्र काही वर्षांत काही कारणे दाखवून उद्योग बंद पाडतात. मग ते आपला गाशा गुंडाळून निघून जातात. इथे त्या कारखान्यात काम करणारे वेदर्भीय हात चोळत बसलेले असतात. लघू उद्योगांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास ६,७४५ उद्योग जरी चालू असले तरी त्यांची अवस्था काही फारशी चांगली असल्याचे दिसत नाही. त्याला कारणेही बरीच आहेत. एक तर शासकीय स्तरावर लालफितशाही ही टप्प्याटप्प्यावर आडवी येत असते. दुसरे असे की सरकारी स्तरावर काम झाले तरी व्यावसायिक बँका कर्ज देताना त्या उद्योजकाचे अक्षरशः हाल करतात. शासकीय यंत्रणा आणि बँका त्या नियोजनाची पार वाट लावतात. परिणामी दोन वर्षांत सुरू होणारा प्रकल्प दहा-दहा वर्षे रखडलेला दिसतो. त्यात तो उद्योजक भिकेला लागलेला असतो.मग कसाबसा उद्योग सुरू होतो, तर त्याला खेळते भांडवल मिळवण्यासाठी बँका पुन्हा त्याचा सूड घेतात. खेळते भांडवल मिळाले की मग कधी कच्च्या मालाचा प्रश्न येतो, तर कधी कामगारांचा. कोणताही कारखाना सुरू झाला की लगेच स्थानिक राजकीय नेते तिथे जाऊन आपली युनियन फॉर्म करतात. मग ते मालकाकडून खंडणी वसूल करण्यास सुरू करतात. अन्यथा कारखान्यात संप घडवून आणतात. विदर्भातील अनेक कारखाने हे अशा राजकीय नेत्यांच्या कथित लालसेपोटी घडवलेल्या संपामुळे बंद पडलेले आहेत. सरकार उद्योग वसाहती उभ्या करते. मात्र तिथे पायाभूत सुविधा देतेच असे नाही. मग त्यासाठी सुद्धा उद्योजक वेठीस धरले जातात. त्यांची अवस्था एका बाजूने सरकार, तर दुसऱ्या बाजूने कामगार आणि तिसऱ्या बाजूने अस्थिर बाजारपेठ अशा सर्व आघाड्यांवर लढताना आणखी अडकित्त्यातल्या सुपारीसारखी झालेली असते. सरकारच्या याच धोरणामुळे अनेक तरुण उत्साही उद्योजक अक्षरशः बरबाद झालेले दिसून आले आहेत. इथे नागपूरच्या मिहान प्रकल्पाबाबत वाचकांचे लक्ष वेधावेसे वाटते. नागपूरला विमानतळाचा विस्तार करून तिथे इंटरनॅशनल कार्गोहब उभे करायचे आणि त्याच्याच बाजूला मोठी औद्योगिक वसाहत उभी करायची अशी योजना महाराष्ट्र शासनाने २००१ साली आखली होती. आज दोन तपे उलटली तरी मिहान प्रकल्प पूर्णत्वास आलेला नाही. इथे पुरेसे उद्योग देखील आलेले नाहीत. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्यातल्या किती जणांना रोजगार मिळाले हे शोधायला गेले, तर तो स्वतंत्र लेखाचा विषय होईल.हे सर्व प्रकार टाळण्यासाठी इथे आधी सक्षम असे नेतृत्व असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर इथे उद्योगस्नेही वातावरण निर्माण होणे हे देखील आवश्यक आहे. इथे सरकारने मोठे कारखाने आणले उद्योग आणले तरी त्यांना पूरक असणारे उद्योग इथे कसे उभे राहतील आणि त्यांना पुरेसे काम कसे मिळेल हे सरकारनेच बघायला हवे. त्यासाठी नेटके नियोजन असायला हवे. तरच या समस्या सुटू शकतील. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या या लेखमालिकेची दखल घेत जनहित याचिका दाखल करून घेतली ही बाब स्वागतार्हच म्हणावी लागेल. हे खंडपीठ एमआयडीसीच्या विदर्भातील कामाकडे लक्ष देखील ठेवणार अशी देखील बातमी आहे. त्याचबरोबर उच्चन्यायालयाने विदर्भातील जाणकार तज्ज्ञांची एक अभ्यास गट सदृश समिती बसवून त्यांची मते घ्यावी आणि या समितीलाच विदर्भाच्या औद्योगिक विकासाकडे देखरेख करण्याची जबाबदारी सोपवावी असे इथे सुचवावेसे वाटते.

हरितक्रांतीच्या काळ्या पाऊलखुणा

उदाहरणार्थ, तांदूळ आणि गहू यांच्या अधिक उत्पादक वाणांसाठी रासायनिक खतांचा वाढता वापर अनिवार्य ठरला. अशा खतांच्या उत्पादनासाठी खनिज द्रव्यांचा वापर होत असल्यामुळे १९७३ साली 'ओपेक' राष्ट्रांनी खनिज तेलाच्या किमती सुमारे चौपट केल्यावर स्वाभाविकपणे रासायनिक खतांच्या किमती गगनाला भिडल्या. अशा परिस्थितीत धान्यांच्या उत्पादनखर्चात वाढ होऊ नये आणि शेतकऱ्यांच्या नफ्यात घसरण होऊ नये या उदात्त हेतूने केंद्र सरकारने रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरीत्या रोखून धरल्या. या प्रक्रियेचा आर्थिक भार केंद्र सरकारला उचलावा लागतो. त्यासाठी आजच्या घडीला वार्षिक सुमारे २.५ लाख कोटी रुपयांचा भार केंद्र सरकारच्या तिजोरीवर पडतो.रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरीत्या रोखून धरल्यामुळे युरिया या खताचा वापर औद्योगिक क्षेत्रातही होत असे. ही गळती थांबविण्यासाठी केंद्र सरकारने युरियाला कडुलिंबाचा लेप (उेरीं) देण्यास सुरुवात केली. या प्रक्रियेमुळे युरियाचा औद्योगिक क्षेत्रातील वापर बंद झाला. परंतु भारतात रासायनिक खतांच्या किमती केंद्र सरकारने कृत्रिमरीत्या रोखून ठेवल्यामुळे अशी खते चोरट्या मार्गाने पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका अशा शेजारच्या देशांत निर्यात होऊ लागली. परिणामी अशा शेजारच्या देशांमधील शेतकऱ्यांना रासायनिक खते स्वस्तात मिळू लागली. हा अवैध व्यापार थांबविण्यास भारत सरकारला यश मिळाले नाही.हरितक्रांतीपूर्वी देशात मोठ्या प्रमाणावर ज्वारी, बाजरी यांसारखी लक्षणीय प्रमाणात कमी पाणी लागणारी पिके घेतली जात होती. परंतु हरितक्रांतीनंतर भात, गहू अशी अधिक पाणी लागणारी पिके घेण्यास सुरुवात झाली. पंजाब, हरियाणा अशा राज्यांत भाताच्या पिकाला पुरेसा पाऊस पडत नाही. तरीही तेथील शेतकरी भाताचे पीक घेतात आणि त्यासाठी भूगर्भातील पाण्याचा बेसुमार उपसा करतात. पाण्याचा असा उपसा करण्यासाठी राज्य सरकारे शेतकऱ्यांना जवळपास फुकटात विजेचा पुरवठा करतात. तसेच केंद्र सरकार शेतकऱ्यांनी पिकविलेला तांदूळ निर्यात करण्याचे काम करते. अशा रीतीने एक प्रकारे पाण्याची तर निर्यात होतेच; पण त्याचबरोबर भूगर्भातील पाण्याचा उपसा करण्यासाठी खर्च होणारा विद्युत पुरवठा, तांदळाच्या उत्पादनासाठी लागणारी रासायनिक खते अशा उत्पादक घटकांवर होणाऱ्या सरकारच्या खर्चाचा भार अंतिमतः भारतामधील कर भरणाऱ्या लोकांना वाहावा लागतो आणि त्याचा लाभ विदेशातील ग्राहकांना होतो. या विसंगतीकडे भारतीय अर्थतज्ज्ञांनी दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येते.

हरितक्रांतीमुळे ज्वारी, बाजरी अशा खाद्यान्नाऐवजी तांदूळ व गहू अशा धान्यांच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्याचा अनिष्ट परिणाम लोकांच्या जीवनावर झाला. तसेच ज्वारी, बाजरीची धाटे हा गुरांसाठी पौष्टिक सुका चारा होता, तो पूर्णपणे बंद झाला. भाताचा पेंढा आणि गव्हाचे काड हा गुरांसाठी निरुपयोगी चारा असल्यामुळे पंजाब व हरियाणा या राज्यांतील शेतकरी असे पिकांचे अवशेष जाळून टाकतात. अशा प्रदूषणामुळे दिल्ली व त्याच्या आसपासच्या रहिवाशांना प्रदूषणाचा उपद्रव होतो आणि त्यांच्या आयुर्मानात घट होते.हरितक्रांतीमुळे पंजाब व हरियाणा या राज्यांत खरीप हंगामात भात आणि रब्बी हंगामात गहू अशी पिके घेतली जातात. त्यामुळे भूगर्भातील पाण्याचा साठा खूपच कमी झाला आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना घरगुती वापरासाठी चांगले पाणी मिळत नाही. तेथील नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या पाण्यात घातक क्षारांचे प्रमाण बेसुमार वाढल्याचा अनिष्ट परिणाम लोकांना भोगावा लागतो. या प्रक्रियेची टोकाची परिणती म्हणजे पंजाब राज्यातून दररोज रेल्वेची एक गाडी भरून कर्करोगग्रस्त नागरिक उपचारांसाठी इतर राज्यांची वाट धरतात.पंजाब व हरियाणा या राज्यांमधील शेतकऱ्यांनी खरीप आणि रब्बी हंगामात अनुक्रमे भात व गहू ही पिके घेण्याऐवजी सात महिन्यांनी काढणीसाठी तयार होणाऱ्या ज्वारीचा पेरा केला, तर पंजाब व हरियाणा या राज्यांमध्ये हरितक्रांतीमुळे निर्माण झालेल्या समस्या संपतील. ज्वारीचे सदर बियाणे 'इक्रिसॅट' या हैदराबादमधील संशोधन करणाऱ्या संस्थेकडे उपलब्ध आहे. सदर वाणाचे हेक्टरी उत्पादन १० टन एवढे प्रचंड आहे. त्यामुळे ग्राहकांना ज्वारी १५ रुपये किलो दराने मिळेल. ज्वारी अशी स्वस्तात मिळू लागली, की सरकारला सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गहू व तांदूळ अनुक्रमे २ व ३ रुपये किलो दराने वितरित करावे लागणार नाहीत. त्यामुळे सरकारचे वर्षाला सुमारे दोन लाख कोटी रुपये वाचतील.आजकाल बहुतांश शेतकरी त्यांच्या शेतात पिकलेले धान्य सरकारला किंवा व्यापाऱ्यांना किमान आधारभावाने विकतात आणि स्वतःच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी लागणारे धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या दुकानातून खरेदी करतात. कारण खुल्या बाजारात ज्या धान्याचा भाव ३५ ते ४० रुपये आहे, ते धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत ३ रुपये किलो दराने वितरित केले जात असे. आता मोदी सरकारने ते विनामूल्य वितरण करण्यास सुरुवात केली आहे. देशातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना उपजीविकेसाठी लागणारे धान्य स्वस्तात उपलब्ध करून देणे हे धोरण प्रशंसनीय असले तरी देशातील ६६ टक्के लोक आता दारिद्र्यरेषेखाली नाहीत.आजच्या घडीला दारिद्र्यरेषेखालील लोकांची टक्केवारी १२ टक्क्यांपेक्षा कमी आहे, असा निती आयोगाचा निष्कर्ष आहे. त्यामुळे सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर वर्षाला जे सुमारे दोन लाख कोटी रुपये खर्च करते, त्यातील सुमारे पाच ते सहा टक्के खर्च अनाठायी ठरतो. सरकारच्या या धोरणामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ मिळणारे शेतकरी आपल्या शेतात पिकलेले धान्य सरकारला वा खासगी व्यापाऱ्यांना विकतात आणि आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी लागणारे धान्य मिळविण्यासाठी रेशन दुकानापुढे उभे राहतात. ही आपल्या आर्थिक व्यवस्थेत निर्माण झालेली विकृती आहे. ज्या लोकांची आर्थिक स्थिती बरी आहे असे लोक रेशन घेण्यासाठी दुकानाकडे वळतही नाहीत. त्यांच्या वाट्याचे धान्य रेशन दुकानदार खुल्या बाजारात विकून भरपूर नफा कमावतात. म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे उद्दिष्टच साध्य होत नाही. त्यामुळे सरकारने आपल्या धोरणात मूलभूत बदल करणे गरजेचे ठरते.सरकारने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना धान्य वितरित करण्याऐवजी त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये अनुदानाची रक्कम जमा करावी. अशी रक्कम त्यांना धान्याची खरेदी करण्यासाठी वापरता येईल याची नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून खातरजमा करता येईल. असा बदल केला की सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अनागोंदी संपेल. अन्न महामंडळावरील कामाचा भार कमी होईल. भ्रष्टाचाराला आळा बसेल. १४२ कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशात ८१ कोटी लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत धान्याचे मोफत वाटप करण्याचे धोरण हे निखालस चुकीचे धोरण आहे.भारत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येत असताना देशातील ६६ टक्के लोकांना त्यांच्या निर्वाहासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर विसंबून राहावे लागत असेल, तर आपल्याला आर्थिक धोरणाच्या संदर्भात नव्याने विचार करायला हवा. प्रश्न आहे तो हे धोरण बदलणार कोण? 'रेवडी'च्या संदर्भात व्यासपीठावर टीका करणे सोपे आहे. परंतु, ती बंद करणे अवघड बाब ठरते, हेच खरे!

'वृद्ध अन् एकटी' च्या समस्या आणि उपाययोजना

समुपदेशन दरम्यान अनेक एकल महिलांचे प्रश्न अभ्यासले जातात. त्यावर मार्गदर्शन केले जाते. अनेकदा वयस्कर महिला ज्यांना आपण सिनियर सिटीझन म्हणू शकतो. या एकट्या राहतात. पतीचे आधीच निधन झाले असल्यास, घटस्फोट झाला असल्यास, अविवाहित असल्यामुळे या महिलांना समवयस्क जोडीदार नसतो. मुलं-मुली असले तरी ते नोकरी, व्यवसायनिमित्त, लग्न झाल्यामुळे दुसऱ्या ठिकाणी वास्तव्याला असतात. या सर्व परिस्थितीमध्ये उतार वयात एकटी राहणारी महिला अनेक आव्हानांना सामोरं जात असते. अशा महिला आर्थिकदृष्टीने संपन्न असल्या किंवा नसल्या तरीही त्यांना जाणवणारे त्रास हे सारखेच असतात. आर्थिक स्वावलंबी महिला सुद्धा फक्त पैसे आहेत म्हणून उतरत्या वयात सुखी राहीलच असे नाही. एकट्या राहणाऱ्या वयस्कर महिलांच्या समस्या आणि त्यांच्या स्वभावाविषयी माहिती, त्यांच्यासाठी उपाययोजना याबद्दलची चर्चा आपण या लेखातून करणार आहोत.समाजात अनेक महिलांना विविध कारणांमुळे उतारवयात एकटं राहतांना आपण बघतोय आपल्या लक्षात येते की त्यांना अनेक शारीरिक आणि मानसिक आव्हानांना तोंड द्यावं लागतं. शारीरिक समस्या हा सर्वात मोठा प्रश्न त्यांना त्रासदायक ठरतो. वाढत्या वयानुसार विविध आजार होतात. त्यात, एकटेपणामुळं वेळेवर औषधं घेणं, डॉक्टरांकडे जाणं किंवा गरजेच्या वेळी मदतीसाठी कोणी नसणं, यांसारख्या अडचणी येतात. घरकाम करतांना उतार वयातील महिलांना मदतीची गरज भासते. घरातली तथा बाहेरील काही कामं करणं अवघड होतं, ज्यामुळे त्यांना मदतनीस नेमावा लागतो. घरासाठी कामवाली व्यक्ती विश्वासू मिळणं महत्त्वाचं असतं. दैनंदिन नियोजन सांभाळून वेळेवर कामावर येणे अशी सर्वांगीण व्यक्ती मदतनीस म्हणून मिळणे उतार वयात आवश्यक असते. आपल्याकडे बहुतांश वेळा घरकामाला कायमस्वरूपी मदतनीस मिळणे अवघड असते, अशी व्यक्ती मिळाल्यास ती फक्त पैसे कमवण्यासाठी व्यावसायिक पद्धतीने काम करते त्यात आपुलकी, प्रेम नसते त्यामुळे ज्येष्ठ महिलांना सेवा मिळू शकते पण त्यात प्रेमाचा अभाव असतो. सुरक्षिततेची कमतरता या महिलांमध्ये पाहायला मिळतो. घरात एकटं राहत असल्यामुळे त्यांच्या बाबतीत चोरी किंवा इतर गुन्हे घडण्याची भीती असते. एकटेपणा हा वृद्ध महिलांसमोरील सर्वात मोठा प्रश्न आहे. कुटुंबीयांपासून किंवा मित्र-मैत्रिणींपासून दूर राहिल्यामुळे त्यांना एकटेपणा वाटतो. उदासीनता आणि नैराश्य त्यांना जास्त प्रमाणात जाणवते. सततचा एकटेपणा, आरोग्याच्या समस्या आणि भविष्याची चिंता यामुळे त्यांना नैराश्य येऊ शकतं.आर्थिक नियोजन, सुरक्षा, आरोग्याची काळजी आणि सामाजिक दबाव यांमुळे त्यांच्यावर सतत मानसिक ताण येतो. त्यातून त्यांचे स्वभाव बदलतात. एकट्या राहणाऱ्या वृद्ध महिलांच्या स्वभावावर त्यांच्या जीवनशैलीचा आणि अनुभवांचा खूप मोठा परिणाम होतो. त्यांच्या वागण्यात आणि सवयींमध्ये काही विशिष्ट गोष्टी दिसून येतात. संवेदनशीलता म्हणजेच त्या खूप हळव्या असतात. त्यांना मदतीची किंवा सहानुभूतीची अपेक्षा असते. कोणत्याही गोष्टीचा जास्त विचार करणं, भविष्याची चिंता, जुन्या आठवणी, घडून गेलेल्या गोष्टींवर पच्छाताप, मन मोकळ करायला कोणी हक्काचे माणूस जवळ नसणे यामुळे त्या सतत विचार करतात. सततच्या असुरक्षिततेमुळे त्या लवकर कुणावरही विश्वास ठेवत नाही. त्यांच्या वागण्यात भीती आणि चिंता दिसून येते. त्यांना सतत असे वाटतं राहते की लोकं आपला गैरफायदा घेतील. या महिलांच्या आयुष्यात परिस्थितीनुसार फार मोठे बदल झाल्यामुळे त्या आपल्या जुन्या सवयी आणि जीवनशैलीला घट्ट धरून ठेवतात. त्यांना नवीन गोष्टी लवकर स्वीकारता येत नाहीत. अशा महिलांच्या स्वभावामागे मानसशास्त्रीय कारणं अभ्यासले असता लक्षात येते की, त्यांना सुरक्षिततेची गरज आहे. उतारवयात शारीरिक आणि भावनिक असुरक्षितता वाढते. त्यामुळे त्या स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी कमी लोकांशी संपर्क ठेवतात, स्वतःच्या कोषात राहतात. त्यामुळे या महिलांच्या आयुष्यात सामाजिक दुरावा निर्माण होतो. सामाजिक कार्यक्रमांमध्ये किंवा कुटुंबात, इतर नातेवाइकांमध्ये त्यांना महत्त्वाचं स्थान मिळत नाही किंवा त्या दुर्लक्षित राहतात त्यामुळे त्या लोकांपासून दूर राहणं पसंत करतात. लोकं आपल्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात असे त्यांना वाटतं असते. आपण आपल्या मनाप्रमाणे आयुष्य जगू शकत नाही ही सल त्यांच्या मनात कायम असते. वय झालेल्या परंतु एकटे राहणाऱ्या महिलांच्या प्रश्नांवर उपाययोजना जाणून घेणे गरजेचे आहे. एकट्या राहणाऱ्या महिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी काही उपाय करता येतात.सामाजिक आणि कौटुंबिक आधार मिळण्यासाठी कुटुंबीयांनी त्यांच्यासोबत नियमित संपर्क ठेवावा, वेळोवेळी त्यांना भेटायला जावं, फोनवर त्यांच्याशी बोलत राहावं यामुळे त्यांना एकटेपणा जाणवणार नाही. शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे मानसिक आरोग्य. मानसिक आरोग्य जपण्यासाठी समुपदेशन मदत करू शकते. त्यामुळे त्यांना योग्य वेळी समुपदेशकाची मदत मिळवून द्यावी. सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे या महिलांसाठी उपयुक्त आहे. अशा महिलांना जवळपासच्या ज्येष्ठ नागरिक संघ, धार्मिक गट, मंडळ, भिशी किंवा इतर सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावं. यामुळे त्यांना नवीन मित्र-मैत्रिणी मिळतील, समवयस्क लोकांशी त्या सुख-दुःख वाटू शकतील. नियमित आर्थिक मदत मिळत राहणे, पैसा उपलब्ध असणे या वयातील प्रमुख गरज असते. त्यामुळे आर्थिक नियोजनाची माहिती त्यांना द्यावी किंवा कुटुंबाने आवश्यक ती आर्थिक मदत करावी.आकडेवारीमध्ये जाणून घेतले असता, साधारणपणे एका शहरात एकट्या राहणाऱ्या वयस्कर महिलांची संख्या किंवा टक्केवारी खूप भिन्न असू शकते आणि ती शहरावर, देशावर आणि वयस्कर महिलेच्या वयोगटावर अवलंबून असते. तरीही, जगभरातील आणि विशेषतः विकसित देशांमधील सामान्य कल पाहिला असता, एकट्या राहणाऱ्या वयस्कर लोकांमध्ये महिलांची संख्या जास्त आहे. सामान्यतः एकट्या राहणाऱ्या वयस्कर लोकांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांची संख्या लक्षणीयरीत्या जास्त असते. कारण म्हणजे स्त्रियांचे आयुष्य पुरुषांपेक्षा जास्त आहे. उतार वयात घटस्फोट झाल्यावर, पतीचे निधन झाल्यानंतर त्यांचे पुनर्विवाह होण्याची शक्यता कमी असणे. वय वाढत जाईल तसतसे एकट्या राहणाऱ्या महिलांची टक्केवारी खूप वाढते. उदाहरणार्थ (अमेरिकेतील आकडेवारीनुसार) ७५ किंवा त्याहून अधिक वयाच्या सुमारे ४२% ते ५०% महिला एकट्या राहतात, तर ६५ ते ७४ वयोगटातील सुमारे २७% महिला एकट्या राहतात. भारतीय शहरांमध्ये किंवा शहरी भागांमध्ये एकट्या राहणाऱ्या वयस्कर व्यक्तींचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा जास्त असते. एकूण वयस्कर लोकसंख्येपैकी प्रमाण पाहिले असता, काही शहरांमध्ये, ६५ वर्षांवरील किंवा त्याहून अधिक वयाच्या एकूण वयस्कर लोकसंख्येपैकी एकट्या राहणाऱ्या महिलांचे प्रमाण ६५% ते ७०% पेक्षा जास्त असू शकते.या समस्यांवर मात करण्यासाठी कुटुंबीय, समाज आणि सरकारने एकत्र काम करणं खूप महत्त्वाचं आहे. अशा महिलांना योग्य भावनिक मानसिक आधार आणि मदत मिळाली, तर त्यांचं आयुष्य अधिक सुखी होऊ शकतं. कुटुंबापासून महिलांना एकटं अथवा लांब राहावं लागणार नाही याच नियोजन घरातील व्यक्तींनी पहिल्यापासूनच करावे. महिला जर पहिल्यापासून नोकरी, व्यवसाय करणारी असेल तर तिने स्वतःचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य, त्याबद्दलचे नियोजन आधीच करावे. शक्यतो नोकरी करणाऱ्या महिलांना सेवा निवृत्तीनंतर एकदम रिकामपण येते, दिनचर्या बदलते आणि त्यातून त्या एकट्या असतील तर जास्तच त्रासदायक ठरते. विविध सामाजिक संस्था, संघटना, समूह यांनी मोठ्या प्रमाणात कार्यरत होऊन ज्येष्ठ महिलांना विरंगुळा म्हणून, वेगवेगळे उपक्रम, समुपदेशन कार्यक्रम राबवावेत. वयोवृद्ध महिलांना कोठेही घराबाहेर पडायचे असल्यास त्यांना सोबत करण्यासाठी, त्या कामात मदत करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. वेळोवेळी या महिलांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, आर्थिक दृष्टीने सक्षम नसलेल्या महिलांसाठी आर्थिक मदत करणारी, त्यांना सुरक्षा पुरवणारी शासकीय यंत्रणा, योजना नियमित राबवणे गरजेचे आहे. अशा महिलांसाठी समाजाने, शेजारील लोकांनी, नातेवाइकांनी एकत्रित येऊन मदत करणे हे पण पर्याय असू शकतात.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष मा.आर.जी.कानडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

मा.श्री राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । दर्शन डोंगरे

दिनांक ९ ऑक्टोंबर रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी फेडरेशन व नॅशनल फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट च्या संयुक्त विद्यमाने आशिया अखंडातील सर्वात मोठी असलेलेली बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीचे मार्गदर्शक,आधारस्तंभ, मा.राधेशामजी चांडक हे ७५ व्या वर्षात पदार्पण करत असल्याबद्दल अमृत महोत्सव सोहळा कार्यक्रम सहकार मंदिर बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता...

सदरील अमृत सोहळा कार्यक्रमांमध्ये माजलगावचे भूषण,सहकार रत्न, श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष श्री.आर.जी कानडे साहेब यांना मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले...

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षांनिमित्त प्रथमच महाराष्ट्रातील सहकार चळवळ सक्षमीकरण करण्याकरिता आपले अमूल्य व महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार वितरीत करण्याचा ठराव घेण्यात आला.

त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व पतसंस्था व मल्टीस्टेट यांच्याशी समन्वय व विचारविनिमय करून प्रथम पुरस्काराचे मानकरी म्हणून श्री आर जी कानडे यांना

नामांकित करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटक मा.नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य.तर प्रमुख उपस्थिती मध्ये मा.नामदार श्री प्रतापराव जाधव,राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य, श्री संजय गायकवाड विद्यमान आमदार बुलढाणा, श्री संजय कुटे,विधानसभा आमदार, श्री सिद्धार्थ खरात, विधानसभा आमदार श्री वसंत जी खंडेलवाल आमदार बुलढाणा हे होते..श्री. आर.जी कानडे यांनी सहकार क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करताना संस्थात्मक विकास, पारदर्शक व्यवहार व सदस्यहित यांचा उत्तम समन्वय साधला आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे केवळ माजलगाव तालुका नव्हे तर मराठवाड्यातील सहकार चळवळ सक्षम होण्यास बहुमूल्य महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या यशस्वी कार्याबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यामुळे निश्चितच माजलगाव चे नाव लौकिक त्यांनी वाढवले आहे..या समारंभास सहकार क्षेत्रातील मान्यवर, विविध पतसंस्था व मल्टीस्टेट,संस्थांचे अध्यक्ष उपाध्यक्ष संचालक कर्मचारी वृंद व सदस्य तसेच स्थानिक नागरिक हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

मुलीचा विवाह तोंडावर असताना संसार वाहून गेला ; आमदार राजेश मोरे यांचा मदतीचा हात

दैनिक वादळ वार्ता
ठाणे । प्रतिनिधी

पुरग्रस्तांच्या हृदयात आशेचा दीप उजळवणारी घटना घडली आहे. पुराने नेलं सर्वस्व,पण मदतीने उजळवली मुलीच्या संसाराची ज्योत असे घडले आहे. जालना जिल्ह्यातील पुरग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आपल्या मुलीचे लग्न तोंडावर असताना संपूर्ण संसार वाहून गेला होता पण संवेदनशील मदतीने नव्या आशेचा किरण महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशाने आणि कल्याण लोकसभा खासदार मा. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाने दाखविला आहे. मराठवाडयात अतिवृष्टीच्या कहराने जालना जिल्ह्यातील अनेक शेतकरी कुटुंबांचं सर्वस्व वाहून गेलं.

कुणाचं घर पाण्याने भरलं, कुणाची जनावरं वाहून गेली, कुणाची शेती उध्वस्त झालीत्याचवेळी एका शेतकरी कुटुंबावर दुहेरी संकट कोसळलं, त्यांच्या मुलीचं लग्न काही दिवसांवर येऊन ठेपलं होतं. पुराच्या रौद्ररूपाने त्यांच्या संसाराचं अक्षरशः अस्तित्व पुसून टाकलं. हातात काहीच उरले नाही आणि मनात फक्त एकच प्रश्न होता आता काय करायचे त्यात आपल्या मुलीचं लग्नही जवळ आले असताना कसं होणार ? आई वडिलांच्या डोळ्यांत पाणी, मुलीच्या स्वप्नांत निराशेचा अंधारहे दृश्य पाहून कोणाचेही हृदय भरून येईल. ती मुलगी आपलीच आहे आणि जवाबदारी ही आपलीच आहे या भावनेने तिच्या लग्नासाठी लागणारा बस्त्याचा खर्च रोख स्वरूपात त्या कुटुंबाच्या हाती सुपूर्त करून त्या कन्येचं कन्यादान केल्याचे भाग्य त्या स्वरुपात प्राप्त झाल्याची भावना निर्माण झाली. त्या क्षणी त्या कुटुंबाच्या डोळ्यांत अश्रू नव्हते, तर देवाबद्दलची कृतज्ञता होती. देव कुठेतरी इथेच माणसांच्या रूपात आहे अश्या पद्धतीने ते व्यक्त होत होते. तर समाजात अजूनही संवेदनशीलता, माणुसकी आणि दयाभाव जिवंत असला पाहिजे असे मत कल्याण ग्रामीण विधानसभेचे आमदार राजेश गोवर्धन मोरे यांनी बोलताना स्पष्ट केले.

जलवायु फेज १ समोरील नाल्याची स्वच्छता करण्यासाठी निवेदन देऊन मागणी

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

खारघर येथील जलवायु फेज १ समोरील नाल्याची तातडीने साफसफाई व झाकणाबाबत भाजप खारघर मंडळाचे जिल्हा सचिव ब्रीजेश पटेल यांनी पनवेल महानगरपालिकेचे उपआयुक्त वैभव विधाते यांना लेखी निवेदन सादर केले आहे. नाल्यात मोठ्या प्रमाणावर गाळ, कचरा व शेवाळ साचल्याने पाण्याचा निचरा थांबला असून, परिसरात दुर्गंधी व डासांचे प्रमाण वाढले आहे. या कारणामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.भाजप उत्तर रायगडचे जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यानी पनवेल महानगरपालिकेकडे तातडीने नाल्याची सफाई करून गाळ काढण्याची तसेच भविष्यातील अस्वच्छता टाळण्यासाठी नाला झाकण्याची मागणी केली आहे. या कामामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल व

सार्वजनिक आरोग्य सुरक्षित राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

सरन्यायाधीशांवर हल्ल्याच्या प्रयत्नाचा विवेक विचार मंच नागपूर तर्फे तीव्र निषेध

दैनिक वादळ वार्ता
नागपूर । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश माननीय भूषण गवई यांच्यावर राकेश किशोर नावाच्या व्यक्तीने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली असून, हा प्रकार अतिशय दुर्दैवी, असंविधानिक आणि निंदनीय असल्याची प्रतिक्रिया विवेक विचार मंच, नागपूर तर्फे देण्यात आली आहे. या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करून निवेदन नागपूर जिल्हाधिकारी यांना सुपूर्द करण्यात आले.विवेक विचार मंचच्या निवेदनात म्हटले आहे की, देशाच्या सर्वोच्च न्यायसंस्थेच्या प्रमुखांवर झालेला हल्ल्याचा प्रयत्न हा केवळ एका व्यक्तीवरचा हल्ला नसून भारतीय न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेवरचा गंभीर आघात आहे. भारतीय लोकशाहीत मतभेद आणि निषेध व्यक्त करण्याचे कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत; मात्र अशा हिंसक कृती असंविधानिक, असभ्य व अवमानजनक आहेत.मंचाने पुढे नमूद केले की काही समाजद्रोही, फुटीरतावादी आणि राजकीय शक्ती या घटनेच्या माध्यमातून समाजात जातीय व धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, याचाही मंच निषेध करतो. हा प्रकार कोणत्याही धर्माशी किंवा समाजाशी संबंधित नसून विकृत व असंविधानिक मानसिकतेचा परिणाम आहे, असे निवेदनात म्हटले आहे.विवेक विचार मंचने सरन्यायाधीशांचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत, या घृणास्पद घटनेची सखोल चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.माननीय सरन्यायाधीशांनी कारवाईचे निर्देश दिले नसले तरी सरकारने स्वयंस्फूर्तीने गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी मंचाने केली.

ठाणे महापालिका लोकशाही दिनाचे ०३ नोव्हेंबर रोजी आयोजन

निवेदन २० ऑक्टोंबर पूर्वी सादर करण्याचे नागरिकांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता
ठाणे । प्रतिनिधी

ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवार, ०३ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी नोव्हेंबर महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच २ ऑक्टोंबरपूर्वी त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर-२०१२पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १

महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

आण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर, व टिपू सुलतान यांचे स्मारक का नाही ?

आझाद क्रांती सेनेचा सवाल

दैनिक वादळ वार्ता
माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव शहरात दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी माजलगाव येथे परमपूज्य बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होत आहे याचा आनंद मनात आहे. परंतु सत्यशोधक अण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर, व टिपू सुलतान यांचे स्मारक का नाही हा प्रश्न सत्तेतील राजकर्त्यांना आझाद क्रांती सेनेच्या वतीने विचारण्यात येतात येणाऱ्या नगरपालिका डोळ्यासमोर ठेवून महापुरुषांच्या स्मारकाचे राजकारण केल्या जात आहे. परमपूज्य बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक शहरांमध्ये होणे ही सर्व

समाजात आनंद उत्सव निर्माण करणारी व शहराच्या वैभवात भर पाडणारी बाब आहे. परंतु स्मारकाचे राजकारण व्हायला नको असे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले आहे. सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाची मागणी १९९९ पासून असताना देखील काय केले हा ही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. अण्णाभाऊ साठे अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकासाठी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे , अहिल्याबाई होळकर व टिपू सुलतान अनुयायी यांना सोबत घेऊन निकरीचा लढा देण्यात येणार आहे. तसेच लवकरच अण्णाभाऊ साठे अहिल्याबाई होळकर व टिपू सुलतान यांच्यावरती प्रेम करणाऱ्या समाज बांधवांची बैठक घेऊन स्मारक समित्या निर्माण करून लढा तीव्र करण्यात येणार आहे. असे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले आहे.

नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पारदर्शकतेने संपन्न

दैनिक वादळ वार्ता
नांदगाव खंडेश्वर । प्रतिनिधी

नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम ८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता तहसील कार्यालयाच्या सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) व पीठासीन अधिकारी सौ. श्रद्धा बबन उदावंत यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित नागरिकांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आरक्षण सोडतीची प्रक्रिया, नियम आणि अटी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर प्रभागनिहाय आरक्षण सोडतीची कार्यवाही पारदर्शक आणि शांततेत पार पडली. या वेळी नगर पंचायत मुख्याधिकारी निवृत्ती भालकर, करण सोयम, विनय मोहोड, विकास सपकाळ, प्रीतम सोनटक्के, योगिता गायकवाड, किरण जवादे, आशिष ढवळे, संजय चौधरकर,

राहुल सावळे, राहील अहमद, नेमिनाथ सानप आदी मान्यवर उपस्थित होते. या सोडतीत प्रभाग क्रमांक १ व २ अनुसूचित जाती (सर्वसाधारण) साठी, प्रभाग क्रमांक ३, ५, ८, ९, १०, १३, १४ सर्वसाधारण (महिला) साठी, प्रभाग क्रमांक ४, ७, ११, १२, १५ नागरी मागासवर्ग (महिला/सर्वसाधारण) साठी, प्रभाग क्रमांक ६ व १७ सर्वसाधारण साठी आणि प्रभाग क्रमांक १६ अनुसूचित जाती (महिला) साठी राखीव असल्याचे घोषित करण्यात आले. एकूण १७ प्रभागांपैकी महिलांसाठी ८ जागा राखीव ठेवण्यात आल्या असून अनुसूचित जाती आणि मागासवर्गीय समाजाला पुरेसे व न्याय्य प्रतिनिधित्व मिळाले आहे. या आरक्षण घोषणेनंतर नगर पंचायतीच्या आगामी निवडणुकीची प्रक्रिया वेगाने सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संभाव्य उमेदवार आणि राजकीय पक्षांकडून निवडणुकीसाठी हालचाली सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. आरक्षण सोडत शांततेत आणि पारदर्शकतेने पार पडल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

मानसिक आजाराबाबत जनजागृती कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थने मानव फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेसोबत यशवंतराव चव्हाण केंद्र आणि आरोग्य अपंगत्व आणि ज्येष्ठ नागरिक विभागाच्या सहकार्याने, यशवंतराव चव्हाण केंद्राच्या सहकार्याने जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यासाठी मानसिक आरोग्य आणि मानसिक आजाराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी चर्चगेट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे नुकतेच जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हा मेळावा कृतीचे आवाहन करणारा एक स्मरणोत्सव होता. वाढती जागरूकता असूनही, मानसिक आरोग्याबद्दल कमी चर्चा केली जाते, विशेषतः दैनंदिन वातावरणात, कारण ते एक अदृश्य अपंगत्व आहे. भावनिक संघर्ष, मानसिक लवचिकता आणि मानसिक आजार यांच्याविषयीचे संभाषण सामान्य करण्याची गरज पूर्वीपेक्षा अधिक तातडीची आहे. परस्परसंवादी चर्चासत्र आणि प्रदर्शनाद्वारे, न पाहिलेल्या संघर्षांना मान्यता देऊन जागरूकता आणि समजूतदारपणा यांच्यातील अंतर कमी करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या चर्चेने अनेकांना भेडसावणाऱ्या मूक आव्हानांकडे लक्ष वेधले आणि सहानुभूती, शिक्षण आणि कृती करण्यायोग्य समजूतदारपणाला प्रोत्साहन दिले.

सचिन चिदंबरम हे सक्रिय श्रवण, भावनिक आधार आणि आत्महत्या प्रतिबंध यांचे तज्ज्ञ आहेत, ज्यांनी आजच्या तरुणांबद्दल आणि आभासी जगावरील त्यांच्या अतिआत्मविश्वासाबद्दल आणि वास्तविक जगाचा सहभाग, सामाजिक कौशल्ये आणि लवचिकता वाढवून समाज संतुलन पुनर्संचयित करण्यात कशी मदत करू शकतो याबद्दल भाष्य केले.महिलांच्या मानसिक आरोग्यावर सामाजिक, जैविक आणि सांस्कृतिक घटकांच्या गुंतागुंतीच्या परस्परसंवादाचा कसा परिणाम होतो याबद्दल टीआयएसएसच्या निवृत्त शिक्षिका शुभदा मैत्रा यांनी भाष्य केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब बॉम्बे नॉर्थचे कमल चोकशी यांनी विशेष मेहनत घेतली.

प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार-आ.संदीप क्षीरसागर

पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला विश्वास

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत आपलाच उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून येणार असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला.आगामी बीड नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.११ (शनिवार) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मोठी गर्दी पाहावयास मिळाली. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार उपस्थित होते. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर

मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना म्हणाले की,अतिवृष्टीच्या पावसामुळे अनेक ग्रामीण भागात नुकसान झाल्यामुळे नगर पालिकेची निवडणूक अगोदर होणार आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधक जातीचे राजकारण करतील. त्यांना न जुमानता जोमाने कामाला लागा. लोकांना काम करून दाखवायचे आहे. लोकांचे काम केले तर लोक डोक्यावर घेतील. लोकांशी संवाद साधून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तत्पर रहा. प्रत्येक वॉर्डात कार्यकर्त्यांनी समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. येणाऱ्या नगर पालिकेच्या निवडणुकीत पक्ष प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. तसेच बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष पदाचा आपलाच उमेदवार हा १० हजार मताने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व जागेवर नगरसेवक निवडून येतील. आमदारकीच्या निवडणुकीत सोबत राहिलेल्या आणि माझ्यासाठी एकनिष्ठ प्रामाणिक राहून काम करणाऱ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांसाठी घरातला सदस्य समजून काम करून निवडून आणणार ते असल्याचे सांगून कार्यकर्त्यांना बळ दिले यावेळी आ.संदीप क्षीरसागरांना देखील कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्या जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटता कामा नये -आ.संदीप क्षीरसागर

शहरातील कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटली नाही पाहिजे. साखळी जर तुटली नाही तर नगर पालिका आपल्याच ताब्यात येणार. जर का कोणी उमेदवार साखळी तोडून गेला तर लोकांना तो माझा उमेदवार नाही असे सांगेल. साखळी तोडणाऱ्याला निवडणुकीत धडा शिकवण्यासाठी जनताच पुढाकार घेईल असा इशारा देखील आ.क्षीरसागरांनी बैठकीत दिला.

'रायबा गणेश मंडळाच्या ३० तरुणांकडून अमरधाम परिसरात ३०० वृक्षांची लागवड घेतली संवर्धनाची जबाबदारी!

दैनिक वादळ वार्ता
बोरद । मंगेश पाटील

सामाजिक भान ठेवून, केवळ सण-उत्सवापुरते मर्यादित न राहता, बोरद येथील 'रायबा गणेश मंडळ' दरवर्षी विविध पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रम राबवत असते. याचाच एक भाग म्हणून मंडळातील उत्साही ३० तरुणांनी यावर्षी बोरद येथील अमरधाम (स्मशानभूमी) परिसरात तब्बल ३०० झाडांची लागवड करून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी घेतली आहे. तरुणांनी हाती घेतलेला हा स्तुत्य उपक्रम निश्चितच इतरांना प्रेरणा देणारा आहे.रायबा गणेश मंडळाने यंदा वृक्षारोपणासाठी गावातील अमरधाम परिसर निवडला. त्यांनी राजपूत समाजाच्या अमरधाम येथे १०० झाडे, तर स्वर्ग

समाजाच्या अमरधाम येथे २०० झाडे लावून, परिसराला हिरवाईची नवी ओळख दिली आहे

या तरुणांनी लावलेल्या झाडांमध्ये केवळ शोभेची रोपे नसून, वड, लिंबू, बदाम, आवळा, पेरू, सीताफळ, बेल आणि आंबा अशा विविध प्रकारच्या फळ आणि औषधी वृक्षांच्या रोपांचा समावेश आहे. यामुळे भविष्यात या परिसराचे रूपांतर एका सुंदर आणि उपयुक्त वनराईत होणार आहे. या मंडळामध्ये २९ तरुण कार्यरत असून, सर्व ३० जणांनी मिळून लावलेल्या या ३०० झाडांचे संगोपन करण्याची आणि त्यांना वाढवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी घेतली आहे. केवळ झाडे लावून थांबायचे नाही, तर ती जगवायची आहेत, या उदात्त हेतूने मंडळातील प्रत्येक तरुण दररोज या रोपांची निगा राखणार आहे. आजच्या काळात अनेक मंडळे केवळ मनोरंजनावर भर देतात. मात्र, रायबा गणेश मंडळाने 'पर्यावरण सेवा हीच खरी ईश्वर सेवा' हा संदेश कृतीतून देत, इतर तरुण मंडळे आणि नागरिकांसमोर एक आदर्श ठेवला आहे. 'या वृक्षारोपण उपक्रमातून आम्ही तरुणांनी एकत्र येऊन समाजासाठी काहीतरी सकारात्मक योगदान देण्याचा संकल्प केला आहे,' असे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी बोरदच्या या ३० तरुणांनी दाखवलेला हा सामूहिक उत्साह आणि सामाजिक बांधिलकी, संपूर्ण जळगाव जिल्ह्यातील तरुणांसाठी एक मोठी प्रेरणा ठरणारी आहे.

पै.दत्ता मगर यांच्याकडून महसूल सहाय्यक कुमारी सोनिया कागदे यांचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता
माळशिरस । प्रतिनिधी

दसुर गावातील गरीब कुटुंबातील मुलगी कुमारी सोनिया शरद कागदे हिने शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर यश मिळवत नुकतीच महसूल सहाय्यक या पदावर नाशिक येथे प्रशासनामार्फत नियुक्ती मिळवली आहे. तिच्या या यशाबद्दल दसुर गावातूनच नव्हे तर संपूर्ण तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशाच्या गौरवार्थ बळीराजा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आणि भावी जिल्हा परिषद सदस्य पै. दत्ता भैया मगर मित्रपरिवाराच्या वतीने सोनियाचा सन्मान व सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यास माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील, उमेश मालक, जानकर, दत्ता भैया मगर, अभिराज पूर्वत, युवराज अंधारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार पाटील व अन्य मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त

केले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून सांगितले की, सोनियाच्या यशाप्रमाणेच गाव, तालुका, जिल्हा व संपूर्ण महाराष्ट्रातील मुलींनी तिचा आदर्श घेऊन उच्चशिक्षणाच्या जोरावर आपल्या आई-वडिलांचा, समाजाचा आणि गावाचा सन्मान वाढवावा. शिक्षणाच्या माध्यमातून यश संपादन करून स्वतःचे व समाजाचे भविष्य उज्ज्वल करण्याचे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाला स्थानिक मान्यवर, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोनियावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

श्री छत्रपती ब्लड फाउंडेशन चा राष्ट्रीय पातळीवर सन्मान

दैनिक वादळ वार्ता
बोरद । मंगेश पाटील

सोशल मिडीयाद्वारे रक्तदात्यांची साखळी निर्माण करुन रक्तदान या महान कार्यात पुढाकर घेणाऱ्या नंदुरबार येथील श्री छत्रपती ब्लड फाऊंडेशनचा 'उज्जयनी रक्त संचार संस्था' सेवा गृप उज्जैन तर्फे 'राष्ट्रीय अवंतिका सेवा सम्मान म. प्र. - २०२५' ने सन्मानित करण्यात आला आहे.श्री छत्रपती ब्लड फाऊंडेशनचा हा २०२५ चा ४था पुरस्कार आहे.नंदुरबार येथील श्री छत्रपती ब्लड फाऊंडेशन या संस्थेने व्हॉटसअप ग्रुपच्या माध्यमातुन अनेक रक्तदात्यांची साखळी तयार केली आहे. जिल्हा रूग्णालयात रक्ताचा तुटवडा भासल्यावर व गरजु रूग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, यासाठी या फाऊंडेशनच्या माध्यमातुन आवाहन केल्यावर गरजुंना रक्तदान करण्यासाठी रक्तदाते धावुन येतात. यामुळे वेळेवर रक्त उपलब्ध झाल्यावर रूग्णांना जीवदान मिळते. रक्तदान हे महान कार्य असून रक्तदानाची साखळी श्री छत्रपती

ब्लड फाऊंडशनने सोशल मिडीयाच्या माध्यमातुन जोडुन ठेवली आहे. म्हणुन या कार्याची दखल घेत मध्य प्रदेशातील उज्जैन येथील उज्जयनी रक्त संचार संस्था' उज्जैन मार्फत श्री छत्रपती ब्लड फाऊंडेशनला राष्ट्रीय अवंतिका सेवा सम्मान म. प्र. - २०२५ जाहीर केला. उज्जैन येथे झालेल्या कार्यक्रमातश्री छत्रपती ब्लड फाऊंडेशनचे सक्रिय सदस्य श्री अरुण शांतीलाल साळुंखे व त्यांची पत्नी सौ. साधना अरुण साळुंखे यांनी हा पुरस्कार घेतला. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र तसेच पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, बिहार,झारखंड, राजस्थान, गुजरात,तेलंगणा, छत्तीसगढ अशा पुर्ण भारतमधून वेगवेगळ्या राज्यांतून ८० संस्थाच्या सम्मान झाला. याप्रसंगी माननीय उज्जैन चे सभापती कलावती यादव, नेता प्रतिपक्ष रवि राय, राज्य मंत्री व वक्फ बोर्ड चे अध्यक्ष सनवर पटेल आणि मुख्यमंत्री मोहन यादवचे मोठे भाऊ नारायण यादव पण उपस्थितीत होते.श्री छत्रपती ब्लड फाऊंडेशनच्या चळवळीत महेंद्र झवर, जीवन माळी अजय देवरे, हितेश कासार, सुधीरकुमार ब्राम्हणे. पो.कॉ. अभय राजपूत आदींचे योगदान आहे.

औसा शहरात एमआयएम पक्षाच्या निवेदनानंतर नगरपरिषदेची तत्पर कारवाई

नाल्यांची सफाई व मुरुम टाकून रस्ते झाले सुगम

दैनिक वादळ वार्ता
औसा । नदिम पटेल

औसा शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांमध्ये पावसाचे पाणी साचले होते. परिणामी कच्च्या रस्त्यांवर खड्डे पडून नागरिकांच्या हालअपेष्टा वाढल्या होत्या. तसेच नाल्यांमध्ये कचरा व चिखल साचल्याने अस्वच्छतेचे प्रमाणही वाढले होते. या पार्श्वभूमीवर २९ सप्टेंबर २०२५ रोजी एम. आय. एम. पक्षाने नगरपरिषदेकडे निवेदन देत तात्काळ स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी केली होती.

या निवेदनाची दखल घेत नगरपरिषद औसाने तातडीने कारवाई करत ११ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रभाग क्र. ०४ मधील हाशमी नगर, करीम नगर परिसरात नाल्यांची सफाई आणि स्वच्छता मोहीम सुरू केली. तसेच के.के. नगर व महाराष्ट्र

बेकरी परिसरात खड्ड्यांवर तात्पुरत्या स्वरूपात मुरुम टाकून रहदारीस चालता-फिरता येण्यासाठी मार्ग मोकळा करण्यात आला.

या कार्यात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, स्वच्छता निरीक्षक, तसेच स्वच्छता विभागातील सर्व कर्मचारी वर्गांनी सक्रिय सहभाग नोंदवला. एम. आय. एम. पक्षाचे शहराध्यक्ष सय्यद कलिम व त्यांच्या संपूर्ण टीमनेही या मोहिमेत पुढाकार घेतला.या तत्पर कारवाईबद्दल परिसरातील नागरिकांनी नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी व एम. आय. एम. पक्षाचे पदाधिकारी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

नंदुरबार जिल्ह्याच्या शहादा तालुक्यातील वैजाली-नांदर्डे येथील वाकी नदी वरील तुटलेल्या पुलाच्या कामासाठी ग्रामस्थांचा थेट 'रास्ता रोको'चा इशारा!

नवीन पुलाचे काम त्वरित सुरू न झाल्यास १६ ऑक्टोबर रोजी प्रकाशा चौफुलीवर आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

शहादा तालुक्यातील वैजाली ते नांदर्डे गावांना जोडणाऱ्या वाकी नदीवरील पूल कोसळल्याने परिसरातील सुमारे ५० गावांचा संपर्क तुटला आहे. गेल्या वर्षी पावसाळ्यात पूल तुटून पडल्याने ग्रामस्थ, शेतकरी, शालेय विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाचे मोठे हाल होत आहेत. पुलाचे भूमिपूजन होऊनही अद्याप काम सुरू न झाल्याने संतप्त झालेल्या परिसरातील ग्रामस्थांनी थेट नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रकाशा येथील वैजाली रोड चौफुलीवर रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सुमारे २५ वर्षांपूर्वी बांधलेला हा पूल जीर्ण झाला होता. दोन वर्षांपूर्वीच प्रशासनाने अवजड वाहतूक बंद केली होती, मात्र गेल्या वर्षी पावसाळ्यातील पुरामुळे पुलाचा भराव वाहून गेला आणि पूल कोसळला. सातपुडा पर्वत भागातील जवळपास ५० गावांना शहादा तालुक्याच्या बाजारपेठेशी जोडणारा हा मुख्य मार्ग असल्याने, पूल तुटल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. प्रवाशांना सुमारे २० ते २५ किलोमीटरचा अतिरिक्त प्रवास करून जावे लागत आहे.या मार्गावरील राज्य परिवहन मंडळाच्या (एसटी) बसेस व इतर छोटी वाहने बंद पडल्याने शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच, रुग्ण आणि सामान्य नागरिकांना दळणवळणासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः शेतकऱ्यांना शेतीची औजारे घेऊन जाण्यासाठी प्रचंड हाल सोसावे

लागत आहेत.ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नवीन पुलाच्या कामासाठी वर्षभरापूर्वी भूमिपूजन झाले आहे, तरीही कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे कामाच्या बाबतीत शंका निर्माण होत आहेत.निवेदनाच्या माध्यमातून प्रशासनाला तातडीने सखोल चौकशी करून पुलाचे काम त्वरित सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. जर हे काम त्वरीत सुरू झाले नाही, तर दिनांक १६ रोजी गुरुवार या दिवशी करणखेडा परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी, नोकरवर्ग आणि शालेय विद्यार्थ्यांच्या वतीने प्रकाशा येथील वैजाली रोड चौफुलीवर तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. निवेदनाची प्रत माहितीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्यासह नंदुरबारचे पालकमंत्री आणि स्थानिक आमदार व खासदारांनाही पाठवण्यात आली आहे.सदर निवेदनावर शहादा पंचायत समितीचे माजी सभापती वीरसिंग ठाकरे सरपंच जितेंद्र चव्हाण, सतीश पाटील शरद पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077